MAHATRANSCO

(CIN No.- U40109MH2005SGC153646)

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## अउदा संवसु विभाग, बुलढाणा


प्रेषक,
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
अउदा संवसु विभाग,
म. रा. वि. पा. कं. मर्या,
विद्युत भवन मागे, चिखली रोड,
बुलढाणा-४४३००१.
E mail- ee1220@mahatransco.in


संदर्भ क्र/काअ/अउदा/संवसु/वि/बुल/मासं/No - 0593 दिनांक :- 4 MAY 2023

विषय :—शिकाऊ उमेदवार कायदा १९६१ अंतर्गत वर्ष २०२२-२३ करिता अउदा संवसु विभाग, बुलढाणा येथे निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी क्रं. -५.

संदर्भ :-१) काअ/अउदा/संवसु/वि/बुल/मासं/५०९ दि. १८/०४/२०२३.
२) अअ/अउदा/संवसु/मंडळ/अकोला/मासं/४२१ दि. २४/०४/२०२३.
३) काअ/अउदा/संवसु/वि/बुल/मासं/०५४८ दि. २५/०४/२०२३.
४) काअ/अउदा/संवसु/वि/बुल/मासं/०५७० दि. २८/०४/२०२३.

१. शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ च्या अंतर्गत या विभागीय कार्यालयाकडुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री (Electrician) या व्यवसायातुन उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराकडुन शासनाच्या ऑनलाईन पोर्टलव्दारे अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २०/०७/२०२२ पर्यंत होती.

२. त्या अनुषंगाने सक्षम निवड समितीने ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या/कागदपत्रांच्या (जात, गुण इ.) आधारे तयार करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवाराच्या निवड यादी क्रं-५ ला मंजुरी दिली आहे. शिकाऊ उमेदवारांची निवड यादी क्रं.-५, त्यांना एस. एस. सी व आय. टी. आय विजतंत्री (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरी नुसार तयार करण्यात आलेली आहे. तसेच सदर निवड यादी मा. अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अकोला यांच्या परवानगीने प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक शिकाऊ उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अशा शिकाऊ उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवुन त्यांच्यातील जेष्ठ उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.

४. निवड यादी क्रं-५ नुसार निवड झालेल्या सर्व शिकाऊ उमेदवारांना त्यांची शैक्षणीक अर्हता, वय, जात उन्नत गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल व सादर करु न शकलेल्या शिकाऊ उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. निवड यादी क्रं-५ नुसार यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारांचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती स्वरुपात असुन पुर्णत: शिकाऊ उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होणेसाठी आवश्यक असलेली पात्रता धारण करित नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबधीत उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. निवड यादी क्रं-५ नुसार यादीत नावाचा समावेश असलेला शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीमध्ये अपात्र आढळुन आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ता धारक शिकाऊ उमेदवारांची स्वतंत्र निवड यादी लावण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, बुलढाणा राखुन ठेवत आहेत.

७. निवड यादी क्र-५ तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी , अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, बुलढाणा राखुन ठेवत आहेत.



Scanned with OKEN Scanner

८. निवड न झालेल्या शिकाऊ उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार अउदा संवसु विभाग, बुलढाणा या कार्यालयाकडे करु नये. शिकाऊ उमेदवाराच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता अउदा संवसु विभाग, बुलढाणा या विभागात निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांची निवड यादी क्र-५ खालील प्रमाणे.

निवड यादी क्रं.-५ (Select List No.5)

| अ. नु | गुणवत्तेनुसार अनु.क | उमेदवारांचे नाव (सर्व श्री) | एकुण सरासरी टक्केवारी | जातीचा प्रवर्ग | निवड प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४७ | निकिता किशोर कोसले | ८२.३९ | इमाव | इमाव | |
| २ | ६१ | दत्तात्रय मानसिंग पिठोरे | ८१.४८ | आ. दुर्बल | आ. दुर्बल | |

९. निवड यादी क्र-५ (Select List-5) मधील उमेदवारांना दि.०८.०५.२०२३ रोजी कार्यकारी अभियंता अउदा संवसु विभाग, बुलढाणा विद्युत भवन मागे, चिखली रोड, बुलढाणा- ४४३००१ या पत्यावर सकाळी ११:०० वाजता हजर रहावे. दि. ०८.०५.२०२३ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल यांची नोद घ्यावी.

१०. कागदपत्र पडताळणीच्या वेळी खालील प्रमाणे मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. आ. टी. आय विजतंत्री गुणपत्रक (सर्व सत्र) व प्रमाणपत्र (सनद).
३. एस. एस. सी गुणपत्रक/प्रमाणपत्र.
४. राखीव गटातुन उमेदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैद्यता प्रमाणपत्र.
५. उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
६. आर्थिक दुर्बल घटक उमेदवार मोडत असेल तर चालु अदयावत प्रमाणपत्र.
७. चारित्र पडताळणी प्रमाणपत्र.
८. आधार कार्ड.
९. बॅक पासबुक.

११. कागदपत्रे पडताळणी करिता येणा-या शिकाऊ उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणा नाही. शिकाऊ उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करिता उपस्थित राहावे लागले.

(विनोद ज. हंबर्डे)
कार्यकारी अभियंता,
अउदा संवसु विभाग, बुलढाणा

**प्रत सविनय सादर :-**
अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, म. रा. वि. पा. कं. मर्या, अकोला.



Scanned with OKEN Scanner